# ठाणे भारत सहकारी बँक लि. (शेड्युल्ड बँक)

वसुली - विधी विभाग, तळ मजला, रिमझीम प्रिमाईसेस, ब्राम्हण विद्यालय समोर, बाजी प्रभु देशपांडे मार्ग, विष्णु नगर, नौपाडा, ठाणे (पश्चिम) - ४००६०२
दुरध्वनी क्र. ८६५२२७७७६९ / E-Mail:- tbsbl.recovery@tbsbl.com

## स्थावर मिळकतीची लिलाव विक्री

सिक्युरीटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन् ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंन्ट ऑफ सिक्युरीटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या कलम १३(४) प्रमाणे ठाणे भारत सहकारी बँक लि. च्या प्राधिकृत अधिकारी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात असलेल्या खालील नमुद स्थावर मालमत्ता "जसे आहे जेथे आहे तत्वाने" व "जसे आहे जे आहे तत्वाने" तसेच "कुठल्याही दायित्वाच्या जबाबदारी शिवाय" खरेदी करण्यासाठी जनता/ इच्छुक बोलीदार यांच्याकडून मोहरबंद प्रस्ताव/ निविदा मागविण्यात येत आहे.

**(लिलावाचे ठिकाण : ठाणे भारत सहकारी बँक लि., वसुली - विधी विभाग, तळ मजला, रिमझीम प्रिमाईसेस, ब्राम्हण विद्यालय समोर, बाजी प्रभु देशपांडे मार्ग, विष्णु नगर, नौपाडा, ठाणे (पश्चिम) - ४००६०२)**

| स्थावर मालमत्ता/ मिळकतीचे वर्णन | राखीव किमत (रुपयात) | इसारा अनामत रक्कम (रुपयात) | मिळकतीची तपासणी | लिलाव दिनांक व वेळ | कर्जदार / गहाणवटदाराचे नाव | कर्जबाकी रक्कम (दि. २८/०२/२०२५ अखेर) |
|---|---|---|---|---|---|---|
| फ्लॅट नं. २०१, क्षेत्रफळ ४७५ चौ.फुट (बिल्टअप), दुसरा मजला, दक्षिणकळी को.ऑप.हौ.सो.लि., प्लॉट नं. १२१, सिटी सर्वे क्र. १८३, मौजे तळेगाव दाभाडे, यशवंत नगर कॉलनी, गोळवलकर मैदाना शेजारी, तळेगाव, ता. मावळ, जि. पुणे - ४१०५०७ | १७,८६,०००.०० | १,७८,६००.०० | खालील नमुद मुद्दा क्र. ५ मधील तरतुदींनुसार विनंतीप्रमाणे | **०७/०४/२०२५** रोजी स. ११.३० वा. | कर्जदार : मे. ऑफबिट डेस्टीनेशन्स गहाणवटदार : श्री. नितीन नागराज शास्त्री व सौ. वंदना नितीन शास्त्री) | रु. **११,९६,५४४.७१** अधिक दि. **०१/०३/२०२५** पासुनचे व्याज व इतर खर्च |

१) लिलावाच्या अटी, शर्ती व इतर माहिती असलेली बोली प्रपत्रे ठाणे भारत सहकारी बँकेच्या वसुली व विधी विभागातून कार्यालयीन वेळेत प्राप्त करता येतील. २) उपरोक्त स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव "जसे आहे जेथे आहे तत्वाने" व "जसे आहे जे आहे तत्वाने" तसेच "कुठल्याही दायित्वाच्या जबाबदारी शिवाय" विक्री करण्यात येणार असून, बँकेच्या व्यतिरिक्त इतर कोणतेही दावे, शुल्क, इ. बाबत पडताळणी करुन घ्यावी. ३) उक्त मालमत्ता हस्तांतरीत करण्याचा संपुर्ण खर्च तसेच मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, सोसायटी मेंटेनन्स, मालमत्ता कर, वीज बिल व भविष्यात येणारा इतर खर्च खरेदीदाराने अदा करावयाचे आहेत. उक्त मालमत्तेवर आजपर्यंत असलेल्या थकबाकी संदर्भात कोणतीही जाणकारी नसून, अशी कोणतीही थकबाकी असल्यास ती भरण्याची जबाबदारी यशस्वी बोलीदार यांची असेल. ४) इच्छूक बोलीदार/प्रस्तावकर्ते यांनी मिळकतीची तसेच कागदपत्रांची पहाणी/तपासणी करुन घ्यावी. ५) वरील नमुद स्थावर मालमत्तेच्या/ मिळकतीच्या तपासणीसाठी इच्छुक बोलीदार हे बँकेचे अधिकारी श्री. योगेंद्र अनंत मुळे (मोबाईल क्र. ९६१९६६२२७६) व श्री. प्रशांत प्रभाकर ओक (मोबाईल क्र. ८१०८१४१३३३) यांचेशी बँकेच्या वसुली व विधी विभागाच्या वरील नमुद पत्त्यावर संपर्क साधू शकतात. ६) इच्छुक बोलीदारांनी बोली अर्ज/प्रस्ताव दि. ०५/०४/२०२५ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत इसारा रक्कमेच्या राष्ट्रीयकृत/खाजगी तसेच शेड्युल्ड बँकेच्या पे.ऑर्डर/डी.डी. सह किवा एन.इ.एफ.टी./आर.टी.जी.एस. द्वारे आपल्या मोहोरबंद निविदा/बोली ठाणे भारत सहकारी बँकेच्या वसुली व विधी विभागात जमा कराव्यात. ७) राखीव किमती खालील प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत व जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल. ८) जमा झालेल्या मोहोरबंद निविदा/बोली प्राधिकृत अधिकारी दि. ०७/०४/२०२५ रोजी स. ११.३० वा. उपस्थित इच्छूक बोलीदार/प्रस्तावकर्ते यांचे समक्ष लिलावाच्या ठिकाणी उघडण्यात येतील. इच्छूक बोलीदार/प्रस्तावकर्ते यांना त्यांच्या बोली/प्रस्ताव रु. २५,०००/- ने वाढविण्याची संधी देण्यात येईल. ९) यशस्वी बोलीदार/प्रस्तावकर्त्यांनी विक्री किमतीच्या २५ टक्के रक्कम लिलावाच्या दिवशी जमा करावी व उर्वरित खरेदी रक्कम लिलावाच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत जमा करावयाची आहे. १०) यशस्वी बोलीदारांनी उर्वरित खरेदी रक्कम वर नमूद केल्याप्रमाणे प्रदान करण्यात कसूर केल्यास, खरेदी किमतीच्या २५ टक्के जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल व उक्त मालमत्तेची विक्री पुन्हा नव्याने जाहीर लिलावाद्वारे केली जाईल. ११) कोणतेही कारण न देता कोणतीही किवा सर्व निविदा फेटाळण्याची आणि/ किवा निविदा उघडण्याची आणि/ किवा विक्री निश्चितीची तारीख आणि वेळ पुढे ढकलण्याचे अधिकार तसेच लिलाव रद्द करण्याचे सर्व अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखुन ठेवले आहेत.१२) लिलावातून प्राप्त झालेली रक्कम कर्ज खात्यात जमा करण्याचा अधिकार बँक राखून ठेवत आहे.

THANE BHARAT SAHAKARI BANK LTD.

दिनांक : ०५/०३/२०२५
ठिकाण : ठाणे

**प्राधिकृत अधिकारी**
**ठाणे भारत सहकारी बँक लि., ठाणे**